प्रकरण दुसरे

# मराठी चरित्रात्मक कादंबरी स्वरूपचिकित्सा व विकास

## प्रकरण दुसरे :

# मराठी चरित्रात्मक कादंबरी : स्वरूपचिकित्सा व विकास

## २.१ प्रास्ताविक :

विविधतेने नटलेल्या व समृध्द झालेल्या वाङ्मयक्षेत्रात असे अनेक वाङ्मयप्रकार आहेत की, ज्यांनी मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेतले गेले. ' कादंबरी ' हा त्यातील एक वाङ्मयप्रकार आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये रवींद्र ठाकूरलिखित ' महात्मा ' ह्या चरित्रात्मक कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करावयाचा असल्याने प्रथम कादंबरी म्हणजे काय व त्यातीलच एक प्रकार असलेली चरित्रात्मक कादंबरी कशी असते, मराठीतील चरित्रात्मक कादंबरी कशी आहे वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधावयाची आहेत.

## २.२ कादंबरी म्हणजे काय ? :

मराठी कादंबरीची वाटचाल पाहताना कादंबरी म्हणजे काय, हे प्रथम पाहिले पाहिजे. ' कादंबरी ' हा शब्द प्रथम बाणभट्टाने वापरलेला दिसून येतो. खरे तर त्याने हा शब्द आपल्या कथेत आलेल्या नायिकेसाठी वापरलेला आहे आणि तोच शब्द रूढ झालेला आहे. तोच आजही आपण वापरत आहोत. कादंबरीसाठी आवश्यक असणारे सर्व गुण त्याच्या कथेत दिसून आले व नंतर तेच महत्त्वाचे मानले जाऊ लागले. सुरूवातीच्या काळात ह्या वाङ्मयप्रकारास फारशी चालना मिळाली नसली, तरी नंतर मात्र ह्या गद्यवाङ्मयप्रकारास चालना मिळण्यास सुरूवात झाली. कादंबरीची सर्वमान्य अशी व्याख्या करणे मात्र अजूनही शक्य झालेले नाही. म्हणूनच उषा हस्तक म्हणतात, " कादंबरी हा साहित्यप्रकार कथा, कविता किंवा नाटक यांच्यापेक्षा प्रकृतीने मूलत: वेगळा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. कादंबरीची सर्वमान्य अशी व्याख्या करणे अजूनही शक्य झालेले नाही. कारण बदलत्या

मानवी जीवनाप्रमाणे कादंबरीनेही विविध रूपे धारण केलेली आहेत. कादंबरीची व्याख्या न करता येण्याचे कारण तिच्या प्रकृतीतच दडलेले आहे.''[१]

कादंबरीसाठी इंग्रजीत ' नॉव्हेल ' हा शब्द वापरला जातो, तर हिंदीत कादंबरीला ' उपन्यास ' म्हणतात. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, '' कादंबरी हा वाङ्मयप्रकार इतका लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक आहे की, त्याचे स्वरूप सांगता आले तरी व्यवच्छेदक लक्षणांनी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे.''[२] ' कादंबरी ' ह्या वाङ्मयप्रकाराच्या गाभ्याचा निर्देश करणारी सर्वसमावेशक अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाड्यांनी केलेला आहे. त्यांच्या मते, '' कादंबरी म्हणजे प्रदीर्घ अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहे, अशी साहित्यकृती असते. कादंबरीत ह्या सर्व गोष्टीमुळे एखाद्या समस्येचा पाठपुरवठा तिच्या विविध संदर्भांसह मांडलेला असतो. एखाद्या पोटसमुहाचे, पोटसंस्कृतीचे तपशिलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचे किंवा समाजाचे तपशिलासह दर्शन घेत त्याचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात.''[३]

ह्या व्याख्येवरून आपणास लक्षात येते की, कादंबरी ही कल्पनासृष्टीच्या साहाय्याने समाजातील मानवाला केंद्रबिंदू धरून त्याच्या भोवतीच घडत असलेली प्रदीर्घ कथा असते.

## २.३ मराठी कादंबरीचा थोडक्यात इतिहास :

मराठी कादंबरीचा इतिहास पाहत असताना आपणास ' यमुनापर्यटन ' पासून विचार करावा लागेल. बाबा पद्मनजी ह्यांची १८५७ सालची ही कादंबरी मराठीतील पहिली स्वतंत्र सामाजिक कादंबरी आहे. मराठी कादंबरीचा इतिहास आपणाला कालखंडानुसार पाहावा लागेल. तो असा : १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला व इंग्रजांची राजवट सुरू झाली.

त्याबरोबर मुद्रणकलेलाही आरंभ झाला. त्यामुळे लेखकांना प्रोत्साहन मिळाले. बाबा पद्मनजी ह्यांची ' यमुनापर्यटन ' (१८५७), लक्ष्मणशास्त्री हळबे ह्यांची ' मुक्तामाला ' (१८६१) व ' रत्नप्रभा ' (१८६६), रिसबुड ह्यांची ' मंजुघोषा ' (१८६६), रा. भि. गुंजीकर ह्यांची ' मोचनगड ' (१८७१), रहाळकर ह्यांची ' नारायणराव व गोदावरी ' (१८८४), विनायकराव ओक ह्यांची ' शिरस्तेदार ' (१८८१) ह्या कादंबऱ्या १८५० ते १८८५ ह्या कालखंडात दिसून येतात.

१८८५ ते १९२० ह्या कालखंडात हरिभाऊ आपटे ह्यांनी ' मधली स्थिती ' (१८८५), ' गणपतराव ' (१८८७), ' पण लक्षात कोण घेतो ' (१८९०), ' यशवंतराव खरे ' (१८९२), ' मी ' (१८९३) इ. सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या वि. सी. गुर्जर ह्यांनी मध्यमवर्गातील सुशिक्षित कुटुंबाची चित्रे रेखाटली. सहकारी कृष्ण (कृष्णाजी अनंत एकबोटे) ह्यांनी सामाजिक व कौटुंबिक विषयांवर अनेक कादंबऱ्या लिहिल्या. ना. ह. आपटे ह्यांनी बोधप्रद अशा कादंबऱ्या लिहिल्या. ना. वि. कुलकर्णी, वि. वा. हडप, श्री. कृ. कोल्हटकर हे अजून काही कादंबरीकार होत. १८८५ ते १९२० ह्या कालखंडातील कादंबरीकारांच्या मनात ध्येयवाद, समाजसुधारणा इत्यादी विषयांची जास्त ओढ असलेली दिसून येते.

१९२० ते १९९० ह्या कालखंडात डॉ. श्री. व्यं. केतकर ह्यांनी आपल्या कादंबरीमधून समाजातील विविध प्रश्नांवरील उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यातून त्यांची समाजशास्त्रीय दृष्टी लक्षात येते. सावरकरांनी ' काळे पाणी ' (१९३७) ह्या कादंबरीत रानटी जमातीतील जीवनपध्दतीचा परिचय करून दिला, न. चिं, केळकर ह्यांनी बोधप्रद अशा कल्पना मांडण्याचा प्रयत्न केला, वा. म. जोशी ह्यांनी जीवनात सत्य, सौजन्य व सौंदर्य ह्या सुमंगल तत्त्वत्रयीला महत्त्वाचे स्थान दिले. त्यांनी कादंबरीलेखनामध्ये विचारसामर्थ्य मिळवून दिले. ना. सी. फडके ह्यांनी ' कलेसाठी कला ' ह्या उद्देशानेच

आपले कादंबरीलेखन केले. उपभोगनिरपेक्ष भावनाविष्कार निर्हेतुक सौंदर्यसर्जनत्व, अपेक्षाभंग इत्यादी गुणांनी त्यांचे कादंबरीलेखन नटलेले आहे. वि. स. खांडेकर ह्यांनी अनेक कादंबऱ्यामधून दीन-दलितांच्या उध्दाराबद्दलची मन:पूर्वक तळमळ व्यक्त केली आहे. त्यांच्या अनेक कादंबऱ्यामधून ध्येयवाद प्रकट झाला आहे. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून तत्कालीन राजकीय प्रश्नांची चर्चा केलेली आहे. भा. वि. वरेरकर ह्यांनी वाचकांच्या हृदयाला थेट भिडणारी साधी, सरळ भाषा वापरून वाचकांच्या मनात समाजसुधारणेविषयी जिवंत तळमळ निर्माण केली आहे. पु. य. देशपांडे ह्यांचे कादंबरीविश्व व्यक्तिवादाची असाधारण ओढ असणारे आहे. विभावरी शिरूरकर ह्यांनी मनुष्यस्वभावाची मार्मिक सखोल अनुभूती घेऊन त्याला वास्तवाची सूक्ष्म झालर देऊन जिद्दी वृत्तीने उठावदार चित्र रेखाटले आहे, वि. वि. बोकील ह्यांनी सांसारिक जीवन, दोन पिढ्यांमधील मानसिक अंतर, झगडा ह्यांचे समरसतेने चित्रण केलेले दिसते. द. र. कवठेकर ह्यांनी विविध व्यक्तिचित्रणात्मक कांदबरीविश्व निर्माण केले. सानेगुरुजी ह्यांनी कुमारवयातील मुलांवर संस्कार करण्यासाठी कादंबरीलेखन केले. विश्राम बेडेकर ह्यांनी 'रणांगण' (१९३९) मध्ये युध्दामुळे उध्वस्त झालेल्या एका तरुणाची प्रणयकथा चित्रित केलेली आहे. बा. सी. मर्ढेकर ह्यांनी संज्ञाप्रवाह पध्दतीचा जाणीवपूर्वक अभ्यास करून जीवनातील विविध अनुभवांचे सुरेख चित्रण आपल्या कादंबऱ्यांमधून केलेले आहे. पु. भा. भावे, बोरकर ह्यांनी समाजातील विविध व्यक्तींच्या भावनांचा, त्यांच्या त्यागाचा विचार करून कादंबरीलेखन केले आहे. वि. वा. शिरवाडकर ह्यांनी जीवनाचे काव्यमय, उत्कट, जिवंत, सामर्थ्यशाली असे दर्शन घडवून कादंबरीचे दालन समृध्द केले. वसंत कानेटकर ह्यांच्या कादंबरीची वैशिष्ट्ये सूक्ष्म, सखोल, परिणामकारक चित्रण, संस्कारवादी, प्रतीकवादी निवेदनपध्दतीची योजना ही होत. म. भा. भोसले, ग. ल. ढोकळ ह्यांनी नवीन जाणिवेने टवटवीत आणि कलात्मकतेने ओथंबलेली, ग्रामीण जीवनातील वस्तुस्थितीचे

जिव्हाळ्याने चित्रण करणारी कादंबरी निर्माण केली. र. वा. दिघे ह्यांचे पाऊल अस्पर्शित, आकर्षक, मुक्त सकस, राकट जीवनाच्या दिशेने उचलले गेले व त्यातून नव्यानेच प्रादेशिक कादंबरी जन्माला आली. त्यांच्या कादंबरीतून कोकणी प्रादेशिक जीवनाला सजीव रूप प्राप्त झाले. १९६० नंतरच्या कालखंडात कादंबरीलेखनास नव्याने धुमारे फुटले. रंजनवादी लेखनाबरोबर बोधप्रधान व समाजवास्तवाचे भान असणारे अशा स्वरूपाचे कादंबरीलेखन निर्माण होऊ लागले. वि. वि. बोकील, उध्दव शेळके ह्यांच्यासारखे एकेकाळचे रंजनवादी कादंबरीकार आपली कलानिर्मिती समाजासाठी करीत राहिले. पु. भा. भावे, गोखले, गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर ह्यांनी जुन्या सौंदर्याबरोबरच नवीन जाणिवांचे आशयधन घेऊन कादंबरीलेखन केले. रंजनवादी पध्दतीने रहस्यकथा, शृंगारकथा ह्यांच्या आधारे काही कादंबरीकारांनी कादंबरीलेखन केले. १९६० नंतरच्या कालखंडात महत्त्वपूर्ण कादंबरीकार म्हणून ' कोसला ' कार भालचंद्र नेमाड्यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी निवेदनाच्या पध्दतीत आमूलाग्र बदल केला व ते यशस्वी कादंबरीकार झाले.

रा. रं. बोराडे, व्यंकटेश माडगूळकर, उध्दव शेळके, जयवंत दळवी इत्यादी कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत प्रादेशिकता आणली. त्या त्या प्रदेशातील लोकांच्या जीवनाचे चित्रण त्यांनी केले. ह्याच काळात दलितांच्या व्यथा व वेदना ह्यांचे वास्तवदर्शी चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या दिसून येतात. 'दलित जाणिवांच्या कादंबऱ्या असेही ह्या कादंबऱ्यांना म्हटले जाते. अण्णाभाऊ साठे, नामदेव ढसाळ, बाबूराव बागूल, केशव मेश्राम, अशोक व्हटकर इ. कादंबरीकारांनी दलित जाणिवेच्या कादंबऱ्या लिहिल्या.

सध्याच्या पिढीतील कादंबरीकारांपैकी महादेव मोरे, राजन गवस, रवींद्र शोभणे, उत्तम बंडू तुपे, आनंद पाटील इत्यादी कादंबरीकार ह्या कालखंडात उल्लेखनीय कादंबरीलेखन करीत आहेत. ग्रामीण वास्तवाचे सशक्त भान असलेल्या ह्या कादंबरीकारांकडून विविध मानवी मनोवृत्तींचे आणि स्वभावाचे चित्रण मार्मिक शब्दात झालेले दिसून येते. सामाजिक

जाणिवांचे बेगडीपण उघडकीस आणण्यात ते यशस्वी झाले आहेत. माणसाच्या फाटक्यातुटक्या जीवनाविषयी वाचकाला चिंतनप्रवृत्त करणे, हेही त्यांच्या कादंबऱ्यांचे यश आहे. विविध सहकारी क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे भीषण वास्तव त्यांनी चित्रण केलेले आढळते. व्यामिश्र समाजवास्तवाचे अवलोकन करून ते कादंबरीच्या माध्यमातून त्यांनी मांडले आहे. समकालीन समाजवास्तवाकडे आजचे कादंबरीकार वळलेले दिसून येतात.

मराठी कादंबरीच्या ह्या सर्व इतिहासातून कादंबरीने अनेक रूपे धारण केलेली आपणास दिसून येते. तसेच कादंबरीचे वेगवगळे प्रकार व समाजातील प्रश्नांचे स्वरूप वाचकांसमोर आलेले दिसते. उदा. पुढील सामाजिक कादंबऱ्या : 'यमुनापर्यटन', 'मधली स्थिती', 'गणपतराव', 'पण लक्षात कोण घेतो', 'रागिणी', 'इंदू काळे सरला भोळे.' पुढील ऐतिहासिक व पौराणिक कादंबऱ्या : 'मोचनगड', 'उष:काल', 'चंद्रगुप्त', 'रूपनगरची राजकन्या', 'वज्राघात', 'स्वामी' (रणजित देसाई), 'झेप', 'मंत्रावेगळा' (ना. सं. इनमादार), 'ययाती'(वि. स. खांडेकर), 'मृत्युंजय' (शिवाजी सावंत). समाजातील रूढी, परंपरा, त्यातून निर्माण होणारा संघर्ष ह्यातून निर्माण झालेल्या कादंबऱ्या म्हणजे 'हद्दपार', 'एल्गार', 'गारंबीचा बापू', 'रात्र काळी घागर काळी' इ. स्थानप्रधान कादंबरीत भाषा, प्रदेश, परंपरागत समाज इत्यादी घटक समाविष्ट झालेले असतात. हिलाच 'प्रादेशिक कादंबरी ' असेही म्हणतात. तीत भौगोलिक प्रदेश महत्त्वाचा असतो. 'बनगरवाडी', 'गोतावळा', 'पाचोळा' ह्या कादंबऱ्यांमधून त्या त्या प्रदेशातील समाजाचे एका विशिष्ट घटकाचे वर्णन आपल्यासमोर आलेले दिसते. संस्कृतीप्रधान कादंबरीत विविध जातीजमातींचे चित्रण पाहावास मिळते. 'कॅलिडोस्कोप' (अच्युत बर्वे), 'मुंबई दिनांक', 'सिंहासन' (अरुण साधू), 'बळी' (विभावरी शिरूरकर), 'वावटळ' (व्यंकटेश माडगूळकर), 'थँक्यू मिस्टर ग्लाड', 'डोंगर म्हातारा झाला' (अनिल बर्वे) ह्या सर्व समस्याप्रधान कादंबऱ्या आहेत. रंजनवादी, सौंदर्यप्रधान कादंबरीमध्ये पुराणकाळ व त्यातील

अद्भुत सृष्टी उभी करून स्वप्नरंजन करणे एवढाच उद्देश असतो. कल्पिताच्या दुनियेत रममाण होऊन आभासापुरता का होईना, पण हवासा वाटणारा असा काळ आपल्यासमोर उभा राहत असतो व त्या काळात, त्या वातावरणातच रममाण होण्यास कोणालाही आवडत असते. मात्र नवी कादंबरी ही वास्तवतेशी अतूट नाते असणारी व कृतिप्रधान नैतिकता मांडणारी आहे. उदा. 'धग' (उध्दव शेळके), 'माणूस' (मनोहर तल्हार), 'डोंबाऱ्याचा खेळ' (भाऊ पाध्ये), 'बखर एका राजाची', 'उच्छाद' (त्र्यं. वि. सरदेशमुख) ह्या कादंबऱ्यांमधून कादंबरीचे आधीचे रचनातंत्र झुगारून ग्रामीण वास्तवाचा समर्थ आविष्कार झालेला आढळतो.

ह्या सर्व प्रकारच्या कादंबऱ्यांमधून विविध प्रकारच्या समस्या, कादंबरीकारांचे वेगवेगळे दृष्टिकोण, वेगवेगळी निवेदनपध्दती ह्या बाबी आपणास दिसून येतात. शेवटी कादंबरीची अजून एक व्याख्या पुढीलप्रमाणे उद्धृत करता येईल : " कथानक व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोण व त्यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तवजीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय."[४]

अशा प्रकारे एकूण मराठी कादंबरीच्या वाटचालीचा आढावा आपण थोडक्यात घेतला. ह्या पार्श्वभूमीवर आता आपण चरित्रात्मक कादंबरीची स्वरूपचिकित्सा करू.

## २.४ चरित्रात्मक कादंबरी : स्वरूप चिकित्सा :

चरित्रात्मक कादंबरी व मूळ चरित्र ह्यांचा संबंध हा असतोच. म्हणून चरित्रात्मक कादंबरीच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या चरित्र वाङ्मयाचा थोडक्यात परामर्श घेऊ.

'चरित्र' हा शब्द इ. स. १६८३ मध्ये जॉन ड्रायडेनकडून क्लूटर्कने लिहिलेल्या चरित्राच्या भाषांतराला लिहिलेल्या प्रस्तावनेत प्रथम वापराला. ' The History of particullar Men's live's ' अशा व्याख्या त्यांनी केलेली आहे. संस्कृतमध्ये चरित्रात

जीवन, वर्तणूक, निरनिराळी कृत्ये इत्यादींचा समावेश केलेला आहे. आपटे ह्याच्या शब्दकोशात 'चरित्रम्' किंवा 'चरितम्' ह्याचे ' Life, Biography, Adventures, History ' असे अर्थ दिसून येतात. मोनियर वुइल्यम्सच्या 'संस्कृत-इंग्रजी शब्दकोशात Adings, Binaving, Behaviur, Habit, Praochice, Acts, Adventures Deets, Expoits (वाचस्पत्य, आचरण, स्वभाव, कृती, आवड) ह्या अर्थाने वापरलेला दिसून येतो.

य. रा. दाते ह्यांनी मराठी शब्दकोशात 'चरित्र' ह्या शब्दाचे पुढील अर्थ दिलेले आहेत: कृत्ये, क्रिया, आचरण, वर्तन, अवस्था, स्थिती, प्रकार, देवांचे, वीरांचे पराक्रम, महाकृत्ये, मर्दुमकीची कामे,इतिहास, कथा, गोष्ट, प्रकार, विशिष्ट व्यक्तीच्या आयुष्यक्रम वर्णन करणारा ग्रंथ.

इतर वाङ्मयप्रकाराप्रमाणेचे 'चरित्र' हा वाङ्मयप्रकारदेखील महत्त्वाचा आहे. 'चरित्र' म्हणजे व्यक्तीचे त्याच्या गुणदोषांसह केलेले चित्रण असते. गुण तेवढे दाखविणे व दोष मात्र झाकून ठेवणे, हा प्रकार चरित्रात नसतो. चरित्र हे कुठल्या तरी एखाद्या क्षेत्रात प्रावीण्य मिळविलेल्या व्यक्तीचे असते. सदा कऱ्हाडे म्हणतात, " विविध क्षेत्रात महत्त्व पावलेल्या विशिष्ट व्यक्तीशी संबंधित अशा घटनांची नोंद करून ठेवणारे इतिहासाचे विविक्षित स्वरूप म्हणजे चरित्र."[६]

'चरित्र' ह्या वाङ्मयप्रकारात चरित्रनायकाच्या कर्तृत्वाबद्दल परिश्रमपूर्वक संकलित केलेली माहिती, त्याच्या कर्तृत्वाविषयी वाचकांच्या मनात असणारी आदराची आणि अभिमानाची भावना ह्यांच्या संयोगातून चरित्रलेखन होत असते. चरित्रलेखन म्हणजे विभूतीपूजन, गुणगौरव निरूपण, विशिष्ट व्यक्तीच्या विशिष्ट कृतीचे अभिमानपूर्वक समर्थन अशा कल्पना चरित्राबद्दल पूर्वी होत्या. चरित्रलेखनात प्रथम मान मिळतो तो ईश्वरावतार आणि साधुसंत यांना चरित्र म्हणजे व्यक्तीचे जीवन, त्या जीवनातून साकार होणारे व्यक्तिमत्व, त्याचा प्रकट होणारा राग, द्वेष, प्रेम, दंभ इ. चरित्रातून भावजीवनही व्यक्त होते

व त्यातून त्याला कथेचे स्वरूप प्राप्त होत असते. व्यक्तीचा संघर्ष, तिच्या महत्त्वाकांक्षा, यशापयश, सुखदु:ख आणि भोवतालचा परिसर आदी गोष्टींमधून घडत जाणारे व्यक्तिमत्त्व चित्रित करणे हे चरित्राचे वाङ्मयीन उद्दिष्ट असते. स्मृती टिकविणे, स्मृती आपल्या मनात कायम राखून ठेवणे, ह्या उद्दिष्टांमुळेच चरित्रलेखन होत असते. चरित्र लिहिणे ही कल्पना तशी जुनीच आहे. आपणास प्रिय असणाऱ्या, आदर्श वाटणाऱ्या व्यक्तीची आठवण कायमस्वरूपी राहण्यासाठी ती माहिती शक्य तितकी मिळवायची व जागृत ठेवायची, ही जी इच्छा असते, त्या इच्छेचे चरित्र हे फळ होय. चरित्राद्वारे चिरंतन स्मारक करण्याचा प्रयत्न चरित्रकाराने केलेला असतो. हे स्मारक फार काळपर्यंत कायम राहते. पूर्वी होऊन गेलेल्या आदरणीय व्यक्तींचे गुणदर्शन करून त्यांची स्मृती कायम ठेवावी आणि पुढच्या पिढीला बोधात्मक असा उपदेश मिळावा, हीच त्यामागे अपेक्षा असते.

चरित्रलेखनाची प्रेरणा आदरणीय व्यक्तीची स्मृती जागवणे, तिच्या आदर्शाचे सातत्य टिकवणे, चरित्रनायकाविषयी असणारी आत्मीयता, कृतज्ञता, हीच भावना बलवत्तर असते. विविध क्षेत्रांमधील व्यक्ती चरित्रविषय होऊ शकतात. ज्यांनी काही अलौकिक असे कार्य केले, अशा व्यक्तींच्या जीवनातील सत्य चरित्रात असते. चरित्रलेखनाचे विविध प्रकार आपणास दिसून येतात. वेगवेगळ्या दृष्टीने चरित्रकाराने चरित्रलेखनात चरित्रनायकाच्या जीवनाचे दर्शन घडविलेले असते. पौराणिक चरित्रामध्ये पौराणिकतेचा पगडा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. मराठीतील आद्यचरित्रकार म्हाइंभट ह्यांनी चक्रधर व गोविंदप्रभू ह्या महानुभाव पंथाच्या संस्थापकांच्या लीळा किंवा आठवणी 'लीळाचरित्रा' (१२७६) त आणि 'गोविदप्रभूचरित्रा' (१२८८) त दिल्या आहेत. त्यांच्या लौकिक व अलौकिक व्यक्तिमत्वाचे दर्शन स्वाभाविक त्यांच्या चरित्रामधून होते. साधुसंतांची चरित्रे ही जाईल भवताप हीच अपेक्षा आपल्या मनाशी बाळगून संतचरित्रकारांनी लिहिलेली आपणास दिसून येतील. नामदेवांनी 'आदि', 'समाधी', 'तीर्थावळी' ह्या अभंगात्मक चरित्रांमधून

ज्ञानेश्वरांचे चरित्रदर्शन केलेले दिसते. ज्ञानेश्वरांच्यावर आजगावकर, दांडेकर, आळतेकर ह्यांनीही चरित्रे लिहिली आहेत. राजकीय व्यक्तींच्या चरित्रांमध्ये राजकीय व्यक्तींनी राजकीय क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा समावेश होतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व त्यांनी केलेल्या अद्वितीय अशा कामगिरीचे चित्रण त्यातून आपल्यास पाहावयास मिळते. विविध कलाक्षेत्रांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या व्यक्तींचे व्यक्तिमत्व कसे घडत गेले, त्यांच्या घडण्यामागे कोणी कोणी पाठिंबा दिला, त्यांच्या जीवनात कसे विविध प्रसंग घडत गेले, त्यांनी त्या त्या प्रसंगांमधून कशी वाटचाल केली, ह्याचे चरित्ररूपाने आपणास दर्शन कलाकारांच्या चरित्रांमधून घडत असते. चरित्रात्मक कादंबरी व मूळ चरित्र ह्यांचा संबंध हा असतोच. मूळ चरित्र जे चैतन्यमय असते, त्याला कोठेही खंड न आणता ते कथानक कादंबरीकाराने फुलविलेले असते. सत्याच्या आधारावर व्यक्तीचा तत्कालीन काळ सजीवरुपाने आपल्यासमोर उभा करून त्याचे पूर्ण जीवनच उभे केलेले असते. व्यक्तीची सुखदु:खे, मनोराज्ये इ. अद्भुत विश्व कादंबरीकार वाचकांसाठी खुले करीत असतो, मानवी जीवनाची बाजू उलगडून दाखवत असतो. तिचे खाजगी जीवनही चरित्रात्मक कादंबरीतून आपल्यासमोर आलेले असते. त्यामुळे ती व्यक्ती कोणी दैवी नव्हती, तर आपल्यासारखीच सामान्य व्यक्ती होती, परंतु स्वकर्तृत्वाच्या तेजाने तिने असामान्यत्व मिळविलेले आहे, असे आपल्या लक्षात येते व आपल्यामध्ये आपल्या स्वत:च्या कार्याबद्दलचा आत्मविश्वास निर्माण होतो. शिवाय आपल्यात निर्माण झालेले दोष, उणिवा नाहीशा करण्याचा आपण प्रयत्न करू लागतो. चरित्रनायकाबद्दलची एक नवीन जाणीव निर्माण होते. चरित्रात्मक कादंबरी म्हणजे चरित्रच असते. कादंबरीत कथानक ज्याप्रमाणे महत्त्वाचे असते, तसेच चरित्रात्मक कादंबरीतही चरित्रनायकाच्या जीवनातील घटना-प्रसंग ह्यांना महत्त्वाचे स्थान असते. त्याच्या भूतकाळातील प्रसंग कादंबरीकाराने नमूद केलेले असतात. चरित्रात्मक कादंबरी ज्या चरित्रापासून निर्माण होते, तो " चरित्र हा वाङ्मय प्रकार नुसता स्वतंत्र

वाङ्मयप्रकार आहे, असे नव्हे, तर ललित वाङ्मय आणि ललितेतर वाङ्मय ह्यांच्या सीमारेषावर असणारा हा वाङ्मयप्रकार आहे," हे ग. का. रावते ह्यांचे निरीक्षण योग्यच आहे.[७]

चरित्राचा संबंध व्यक्तिजीवनातून आकार घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी आहे. जीवन जगत असताना व्यक्तीचे विविध स्वभावदर्शन होत असते. राग, द्वेष, प्रेम इत्यादी गोष्टींकडे दुर्लक्ष न करता व्यक्तीच्या कृतीतून तिचे विशेष वेचण्याचा प्रयत्न चरित्रातून होत असतो. म्हणजेच व्यक्तिमत्त्व टिपण्याचा प्रयत्न चरित्रकार करीत असतो. वाचकही चरित्राकडे ह्याच उद्देशाने वळत असतो. व्यक्तिजीवन जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येकालाच असते. चरित्रातून एक संपन्न व्यक्तिमत्त्व यथार्थपणे साकार होत असते.

" इतिहासाप्रमाणेच समाजाला ज्ञान देणे, राष्ट्रभक्तीची शिकवण देणे, स्फूर्ती देणे, हेच चरित्रलेखनाचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे, हे आपणास सहज मान्य होईल. केवळ कलात्मक सौंदर्याचे, रचनेच्या सौंदर्याचे दर्शन घडविणे, हाच चरित्राचा हेतू असावा, ही खरोखरच अगदी करंटी कल्पना आहे. स्फूर्ती देणे, ध्येयवाद शिकविणे, थोर आदर्श समाजापुढे उभा करणे, हेच चरित्राचे खरे कार्य असले पाहिजे. श्रेष्ठ चरित्रकार हा समाजाचा शिक्षक आहे. त्याने त्याला पटलेला पक्ष घेऊन स्वत: काढलेले निष्कर्ष समाजाला शिकवायचे नाहीत, तर कोणी शिकवायचे ? "[८] रावते ह्यांचे हे मत खूपच बोलके आहे.

ऐतिहासिक व्यक्तीच्या जीवनावर कादंबरी लिहिण्यापेक्षा समकालीन व्यक्तीच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याचा प्रयोग करण्याची कल्पना काही लेखकाच्या मनात आली. त्यातूनच चरित्रात्मक कादंबरीला सुरूवात झाली व ती आता मराठीत चांगलीच मूळ धरत असल्याने ह्या कादंबरीप्रकाराची थोडी चर्चा करणे येथे उपयुक्त ठरते. ऐतिहासिक व्यक्तीच्या जीवनावर आधारित लिहिलेल्या कादंबऱ्या आणि समकालीन व्यक्तीला केंद्रबिंदू समजून लिहिलेल्या कादंबऱ्या ह्यांच्या एकूण स्वरूपात फरक असतो. समकालीन

व्यक्तीच्या जीवनावर लिहीत असताना तिच्याविषयी अलिप्तपणा राहत नाही. कारण ती व्यक्ती आपल्या जवळच असते. काही प्रमाणात आपल्याला ती माहीत असते. त्यामुळे तिच्या संदर्भात विश्वसनीय अशी माहिती मिळण्याची शक्यता असते. विविध प्रसारमाध्यमांद्वारे आपणास त्या व्यक्तीचे एकूण व्यक्तिमत्त्व माहीत असते व ते आपणास स्पष्ट असे दिसत असते. त्या माहितीचा उपयोग करून चारित्रात्मक कादंबरीकाराला काही गोष्टींची काळजी घ्यावी लागते. महान व्यक्तीच्या जीवनाबद्दल खाजगी गोष्टी जशाच्या तशा सांगणेही बरोबर ठरत नाही आणि उचितही वाटत नाही.

समकालीन व्यक्तीच्या जीवनावर आधारित कादंबरी लिहिण्याच्या मार्गातील मुख्य अडचण म्हणजे माहिती देत असताना काल्पनिकतेचे प्रमाण अजिबात चालत नाही. तसेच चरित्रग्रंथाला कादंबरीचे स्वरूप देत असताना ती जास्त आकर्षक होण्यासाठी जर अतिरिक्त कल्पनांच्या आहारी जाऊन त्यांचा प्रमाणाबाहेर वापर केला, तर कादंबरीतील विश्वासार्हता कमी होते. शिवाय चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसाही आपल्या मनावर बिंबत नाही. दादा गोरे म्हणतात, “ चरित्रात्मक कादंबरीकाराला चरित्रनायकाचा जीवनेतिहास संपूर्ण ज्ञात असूनही त्याचे केवळ निवेदन, कलात्मक निवेदन करणे, हे त्याचे कार्य नसते. तो आपल्या लेखनाद्वारे चरित्रनायकाच्या जीवनाचा भावनात्मक प्रत्यय घडवित असतो, एवढेच नाही, तर कादंबरीतील पात्राचा व्यक्तित्वविकास दाखविण्यासाठी काल्पनिक पात्रे, प्रसंग निर्माण करून इतिहासाला बाधा न येऊ देता हे कार्य कादंबरीलेखक करीत असतो.”[१]

चरित्रात्मक कादंबरीत चरित्राप्रमाणेच नायकाच्या संपूर्ण जीवनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न कादंबरीकार करीत असतो. चरित्रनायकाच्या जीवनातील काही घटना आधारासाठी घेऊन त्याच्या आधारे नंतर घटनांची जुळणी केली, तर त्यास कादंबरीचे रूप येण्याची शक्यता असते. चरित्रात्मक कादंबरीत वास्तवाच्या आणि कल्पिताच्या मर्यादा असतात. चरित्रनायकाच्या जीवनासंबंधी कसोशीने माहिती मिळविलेली असते. तिच्या आधारे

कादंबरीची उभारणी झालेली असते. ऐतिहासिक कादंबरीत बऱ्याचदा बखरींमुळे आणि दंतकथांमुळे अद्‌भुतता आलेली असते. ‘उष:काल’ ह्या कादंबरीच्या परंपरेतील कादंबऱ्या ह्या संदर्भात लक्षात घेता येतील. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरी बऱ्याचदा सत्यसृष्टीपासून दूर गेलेली असते. चरित्रात्मक कादंबरीकाराला मात्र वास्तवापासून, सत्यसृष्टीपासून फारसे दूर जाऊन चालत नाही. कारण ऐतिहासिक कादंबरीतील काळ व चरित्रात्मक कादंबरीतील काळ ह्यांच्यात फरक असतो. चरित्रनायकाचा काळ हा चरित्रात्मक कादंबरीकाराच्या जवळचा असतो. चरित्रलेखनासाठी आवश्यक असणारे सर्व पुरावे त्याला उपलब्ध असतात. त्यामुळे इतर मनोरंजनात्मक कादंबरीत कादंबरीकाराने केलेला आविष्कार जसा असतो, तसा आविष्कार चरित्रात्मक कादंबरीत मिळत नाही. तसेच मनोरंजनात्मक कादंबरीकाराप्रमाणे चरित्रात्मक कादंबरीकाराला स्वातंत्र्य नसते. मनोरंजनात्मक कादंबरीचा नायक बहुधा काल्पनिक असतो. जर नायक काल्पनिक नसेल व ऐतिहासिक असेल, तर ती कादंबरी ऐतिहासिक आणि शिवाय चरित्रपरही ठरते. चरित्रात साकारलेली व्यक्ती आपण पूर्णपणे जाणून घेतलेली असते. कादंबरीकार स्वप्नांच्या दुनियेत आपणास सहज पोहोचवू शकतो. आपल्या स्वत:च्या इच्छेप्रमाणे तो वाचकांसाठी इमले रचत असतो. तसे चरित्रात स्वत:च्या इच्छेला वावच नसतो. परंतु चरित्रात्मक कादंबरीची निर्मिती होत असताना चरित्र व कादंबरी ह्यांचा आधार घ्यावाच लागतो.

प्रत्यक्षात जीवन जगलेल्या व्यक्तीची जीवनकथा चरित्रात्मक कादंबरीत कल्पिताच्या आधाराने सांगितलेली असते. त्यात चरित्र, कादंबरी, इतिहास एकजीव करण्याचा प्रयत्न केलेला असतो. चरित्रनायकाच्या जीवनाची कथा सूक्ष्म अशा तपशिलांसह न सांगता फक्त त्यातील महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनांकडेच लक्ष दिलेले असते. चरित्रात्मक कादंबरीत नायकाच्या जीवनातील मोकळ्या जागा कल्पिताच्या व स्वानुभावाच्या आधारे भरून काढण्याचा प्रयत्न करता येतो. चरित्रात्मक कादंबरीकार संवाद, वातावरण, नाट्यमयता,

कथा ह्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी कल्पनेच्या आधारे त्यांची उभारणी करू शकतो. चरित्रात्मक कादंबरी ही फक्त कादंबरीही म्हणता येत नाही. कारण तिच्यात प्रत्यक्षातल्या जीवन जगलेल्या व्यक्तीचे जीवन चित्रित केलेले असते. तसेच फक्त चरित्रही म्हणता येत नाही. कारण लेखकाने पूर्णच सत्य सांगितलेले नसते. चरित्रात्मक कादंबरीत लेखकाची भूमिका चरित्रकाराची, पण त्याने स्वीकारलेले तंत्र कादंबरीकाराचे असते. म्हणूनच त्यास 'चरित्रात्मक कादंबरी' म्हणणे उचित ठरते.

चरित्रात्मक कादंबरीची उभारणी करीत असताना चरित्रात्मक कादंबरीकारास चरित्राचा आधार घ्यावा लागतो. परंतु चरित्र म्हणजे कादंबरी नसते आणि कादंबरी म्हणजेही चरित्र नसते. ह्या दोन्ही प्रकारांमध्ये आपणास फरक जाणवतो तो असा की, चरित्र म्हणजे चरित्रनायकाच्या जीवनाचे प्रत्यक्ष चित्रण असते. लिहीत असताना सत्याचे बंधन पाळावे लागते. चरित्रकाराला हवा तसा चरित्रनायक उभा करता येत नाही. त्याचे व्यक्तिमत्त्व आपल्या मनाप्रमाणे घडविता येत नाही. त्याचे व्यक्तित्व जे मुळापासून आहे, तेच त्याला मांडावे लागते. नवनिर्मिती चरित्रकाराला अजिबात करता येत नाही. कादंबरीचे सर्वच लिखाण कल्पनांच्या आधारे होत असते. काल्पनिक व्यक्तीच कादंबरीकार साकारत असतो. तो नायकास हवा तसा घडवू शकतो. कारण तो त्याचा आत्माविष्कार असतो. सत्याचे बंधन कादंबरीला नसते. कारण ती कादंबरीकाराची नवनिर्मिती असते. कादंबरीकार कल्पकतेने नवे नवे अनुभव घडवू शकतो. चरित्रकाराला तसे स्वातंत्र्य नसते. सत्यास धरूनच त्याचे लिखाण असते. कादंबरीकार कल्पनाशक्तीद्वारे बोलके, उत्कंठा निर्माण करणारे लिखाण करू शकतो.

चरित्र आणि कादंबरी ह्या दोहोंमध्ये आणखी एक फरक असा की, कादंबरीत साकारलेला नायक आपल्याला माहीत नसतो. चरित्रातील नायक मात्र आपण पूर्णपणे जाणून घेतलेला असतो. कादंबरीकार स्वप्नांच्या दुनियेत आपल्याला सहज पोहोचवू

शकतो. आपल्या स्वत:च्या इच्छेप्रमाणे तो वाचकांसाठी इमले रचत असतो. चरित्रात मात्र चरित्रकाराच्या स्वत:च्या इच्छेला वाव नसतो.

चरित्रात्मक कादंबरीत कल्पिताला वास्तव व वास्तवाला कल्पित असे सोयीनुसार स्वरूप देता येते. चरित्रात्मक कादंबरी म्हणजे कादंबरीतील लेखनप्रकृती व चरित्रातील समतोल ह्यांचा एक संकरित वाङ्मयप्रकार मानावा लागेल. चरित्रात्मक कादंबरीत व्यक्तिजीवनातील मनोविकार व भावजीवनातले भोवतालच्या परिसराने घडत जाणारे व्यक्तित्त्व साकार होते. बाह्य जीवनाचा अंतर्जीवनाशी संयोग घडून येत असतो. चरित्रलेखन व कादंबरीलेखन ह्यातील लेखनपूर्व व लेखनोत्तर तटस्थता व तादात्म्यता ह्यात समतोल साधणे आवश्यक असते. चरित्रनायकाचे मनोदर्शन ऐतिहासिक पार्श्वभूमीवर घडविले जाते. त्याचबरोबर चरित्रकाराची भूमिका व कादंबरीकाराचे तंत्र ह्या दोन्ही गोष्टी चरित्रात्मक कादंबरीकाराने अवगत केलेल्या असतात. तसेच चरित्रात्मक कादंबरीची उभारणी करीत असताना आणखी काही साधनांचा आधार घ्यावा लागतो व त्यांच्याद्वारे चरित्रनायकाच्या जीवनातील प्रत्यक्ष जीवन डोळ्यासमोर उभे करून त्याद्वारे चरित्रात्मक कादंबरीचे लिखाण करावे लागते. इतिहास, आत्मचरित्र, दैनंदिनी, पत्रे, चरित्रनायकाचे प्रकाशित लिखाण, आठवणी, आख्यायिका, चरित्रग्रंथ, चरित्रनायकाचे इतर व्यक्तिगत अवशेष(छायाचित्रे, कपडे, सर्व प्रकारचे संग्रह) व मानसशास्त्रीय साधने (चरित्रनायकाचे आत्मपरीक्षणात्मक निरीक्षण, चरित्रनायकाच्या ठाम कृती, हस्ताक्षर) ही आणखी काही साधने होत.

चरित्रात्मक कादंबरी लिहीत असताना इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचे अवलोकन म्हणजे इतिहास होय. ज्या काळता ती व्यक्ती जगत असते, त्या काळातील घटना-प्रसंग, राजकीय, सामाजिक, धार्मिक, स्थित्यंतरे म्हणजे इतिहास. इतिहासात मानवी जीवनातील भावनाविष्कार अव्यक्त असतो. तो व्यक्त

करण्यासाठी ऐतिहासिक कादंबरी निर्माण झाली. ती ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या साहाय्याने लिहिलेली असते. म्हणजेच ऐतिहासिक पार्श्वभूमीवर तिने अधिक लक्ष केंद्रित केलेले असते. त्यामुळे त्यातून खरेपणाची अपेक्षा करता येते. इतिहासात सत्यच असते. कारण सत्याशिवाय इतिहासच होऊ शकत नाही. " जिवंत प्राण्याचे डोळे काढून घेतले म्हणजे तो जसा निरूपयोगी ठरतो, तसे इतिहासातले सत्य जर तुम्ही काढून घेतले, तर बाकी उरते ती कसलाही फायदा नसलेली कथा," हे ग. का. रावते ह्यांचे विधान योग्यच आहे.[१०]

चरित्रात्मक कादंबरी लिहिण्यासाठी इतिहासातल्या घटनांची कादंबरीसाठी निवड करावी लागते. इतिहास लिहीत असताना इतिहासकार केवळ चरित्र लिहीत नाही आणि चरित्र लिहीत असताना चरित्रकार केवळ इतिहास लिहू शकत नाहीत. इतिहास लिहीत असताना व्यक्तीच्या जीवनातील ऐतिहासिक घटनांना महत्त्व असते. चरित्रात्मक कादंबरीत मात्र महत्त्व असते ते व्यक्तिजीवनाला. चरित्रात घटनांना काही प्रमाणात महत्त्व प्राप्त होत असते. परंतु ते व्यक्तिजीवनाच्या संदर्भातच. व्यक्ती केंद्रबिंदू असून त्याद्वारे सर्व गुंफण केलेली असते. चरित्रकार जीवनाचेच चित्र रेखाटीत असतो. तरीही ऐतिहासिक पार्श्वभूमीला दुय्यम स्थान असते. म्हणूनच चरित्रात्मक कादंबरी आणि ऐतिहासिक कादंबरी ह्यांच्या घटकांमध्ये फारसा फरक नाही. तथापि ह्या दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यांमध्य काहीसा वेगळेपणा निश्चितच असतो.

ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याची प्रवृत्ती मराठीत 'स्वामी' (१९६२) पासून वाढली. 'स्वामी' चा प्रभाव फक्त ऐतिहासिक काळापर्यंतच मर्यादित राहिला नाही. 'मृत्युंजय' (१९६७) ही पौराणिक कादंबरी अप्रत्यक्षपणे 'स्वामी'च्याच परंपरेत सामावते. तसेच 'स्वामी' ला मिळालेल्या लोकप्रियतेच्या परिणामस्वरूपच चरित्रपर कादंबऱ्या मोठ्या प्रमाणात लिहिण्यात आल्या. 'स्वामी' मध्ये माधवराव व रमाबाई ह्यांची जीवनकथा, तर ना. सं. इनामदारांच्या कादंबऱ्यांमध्ये बाजीराव, मस्तानी, त्र्यंबकजी डोंगळे, औरंगजेब अशा

काही ऐतिहासिक व्यक्तींचे जीवनचित्रण आलेले आहे. चरित्रात्मक कादंबरीतही चरित्रनायकाचे जीवनचित्रणच उभे केलेले असते. ऐतिहासिक कादंबरीत भावनात्मकतेचा प्रत्यय जास्त घडविलेला असतो.

आत्मचरित्र व्यक्तीच्या जीवनाशी संलग्न असते. चरित्रनायकाच्या जीवनाची कथा इतर व्यक्तींकडून ऐकण्याऐवजी चरित्र नायकाच्याच तोंडून ऐकली, तर ती अधिक वाचनीय होते. आत्मचरित्रामागची नेमकी हीच प्रेरणा आत्मचरित्र लिहिण्यामागे प्रभावी असल्याचे आपल्याला दिसून येते. आत्मचरित्रामागील प्रेरणा समर्थनाची आहे की स्वत:चे कर्तृत्व फुगवून सांगण्याची आहे, हेही पाहावे लागते. चरित्रकाराला चरित्रनायकाच्या बालपणीच्या घडामोडी लिहिताना स्मरणशक्तीला ताण द्यावा लागतो. परंतु आत्मचरित्रकाराने आपल्या बालजीवनातील सर्वच घडामोडी तपशीलवार सांगितलेल्या असतात. एवढा ताण पडत नाही. तसेच आत्मचरित्रातून अखेरच्या जीवनातील कडू-गोड आठवणींचा माहितीपुरवठा मिळतो. म्हणून चरित्र लिहिण्यासाठी आत्मचरित्र उपयोगी पडते.

मराठी चरित्रात्मक कादंबरीत उणीव राहण्याचे एक मोठे कारण म्हणजे पत्रे व दैनंदिनी ह्यासारख्या साधनसामग्रीची तुटवडा पूर्वी जी राष्ट्रपुरुषांची चरित्रे लिहिली जात, त्यात पत्रे व दैनंदिनी ह्यांचा उपयोग केलेला आढळतो. उदा. पांगारकरांनी दैनंदिनीचा वापर करून 'चरित्रचंद्र' लिहिलेले दिसून येते. त्यांच्या पत्रांमधून राजकीय स्वरूपाच्या विषयांवरील त्यांच्या मतांचा आणि त्यांनी केलेल्या उघड-चळवळीतील सभासंमेलने ह्यांचा तपशील आपणास जाणून घेता येतो. दैनंदिनीतून व्यक्तीचा जीवनदर्शी तपशील उपलब्ध होतो. चरित्रनायकाच्या अंतरंगाचे दर्शन दैनंदिनीतून घडत असल्यामुळे दैनंदिनी अधिक विश्वसनीय ठरते. तसेच ती रोजच्या रोज लिहिलेली असल्यामुळे चरित्रनायकाला आपल्या स्मृतीला ताण द्यावा लागत नाही. रोजच्या रोज दैनंदिनी लिहिली जात असल्यामुळे चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसाकसा होत गेला, ह्याची कल्पना त्या दैनंदिनातून येत असते.

पत्रांमधूनही चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना तर येतेच, शिवाय व्यक्तिमत्त्वही सूचित होते. पत्रात चित्रित झालेले मन:स्थितीचे दर्शन, पत्रातून मित्रांशी, जिवाभावाच्या माणसांशी मारलेल्या गप्पा, त्यातून केलेला उपदेश ह्यातून स्वभावदर्शन होते. म्हणून पत्रलेखन हे स्वभावदर्शनाचे एक माध्यम ठरते.

चरित्रनायकाच्या व्यक्तिगत जीवनाविषयी अनेक लोकांनी निरनिराळ्या आठवणी सांगितलेल्या असतात. त्या चरित्रनायकाच्या स्वभावाच्या निरनिराळ्या बाजू समजून देतात. पत्रे व दैनंदिनीच्या दृष्टीने पाहिले, तर आठवणींचे महत्त्व अधिकच वाटते. दैनंदिनी, पत्रे ह्यातून चरित्रनायक हे खाजगी जीवनाचे संदर्भ सहसा आपल्या लिखाणात येऊ नये, ह्याची दक्षता घेतात. त्यांच्या आठवणी स्वत:च्या नात्यातल्या माणसाने लिहिलेल्या असल्यामुळे त्यांच्या अशा जीवनपटावर प्रकाश पडला जातो. उदा. न. र. फाटकांनी लिहिलेल्या चरित्रावरून न्या. रानडे खाजगी जीवनात कसे वागत होते, ह्याची नीटशी कल्पना येत नाही. पण तेच फाटकांनी लिहिलेल्या चरित्राला जोडून रमाबाईंनी लिहिलेल्या आठवणी वाचल्या म्हणजे रानडे ह्यांचा व्यक्तिमत्त्वाची परिपूर्ण व सुस्पष्ट कल्पना येते. व्यक्तीचा स्वत:चा स्वभाव कागदावर सत्य स्वरूपात उमटलेला नसतो. पण आठवणींच्या माध्यमातून आपल्यासमोर तो येतो, कोणताही आडपडदा न ठेवता चरित्रनायक कसा होता व त्याचा खरा स्वभाव कसा होता, हे लक्षात येते.

आख्यायिका मनोरंजक असतात. आख्यायिकांमुळे चरित्रातील नीरस अंश दूर होतो, चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या एखाद्या पैलूविषयी विस्तारित माहिती मिळते. परंतु आख्यायिका ह्या चरित्रलेखनाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात उपयोगी पडत नाहीत. चरित्रनायक जसा होता, तसा तो चित्रित होईल, असे नाही. ह्या आख्यायिका विश्वसनीय

आहेत की नाही, ह्याविषयी आपणास शंका निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून आख्यायिका ह्या मनोरंजन जरी करीत असल्या तरी त्या सर्वच खऱ्या असतात, असे नाही.

मानसशास्त्र म्हणजे मानसिक व्यवहाराचे शास्त्र. त्यात सूक्ष्म परीक्षण आलेले असते. माणूस कसा वागतो, त्याच्या चमत्कारिक वागण्यामागील कारण काय, ह्या सर्वांचा उलगडा मानसशास्त्राच्या आधारे करता येतो. चरित्रकाराला मानसशास्त्राकडून बरेचसे शिकण्यासारखे, घेता येण्यासारखे आहे. चरित्रकाराला व्यक्तीच्या गूढतेचे आकलन व्हावे म्हणून मानसशास्त्राचा आधार घेता येतो. मानसशास्त्राच्या आधारे त्याच्या मनोवृत्तीचाही अभ्यास करता येतो. मानसशास्त्रीय पध्दतीमुळे आत्मनिष्ठ निर्णयाच्या आधारे वस्तुनिष्ठ निर्णयाप्रत येता येते व अधिकाधिक अचूकता गाठता येते.

मानसशास्त्राइतकेच हस्ताक्षराचे शास्त्र चरित्रलेखनाच्या कामी उपयुक्त ठरते. अक्षरावरून मनाची अवस्था कशी होती, ह्याची कल्पना येते. मानसशास्त्राची एक उपशाखा म्हणून हस्ताक्षराचे शास्त्र उपयोगी पडते.

वरील सर्व साधनांद्वारे चरित्रकाराला चरित्रनायकाच्या संपूर्ण जीवनाचे यथार्थ दर्शन घडते आणि त्याद्वारेच चरित्रात्मक कादंबरी निर्माण होते. चरित्रात्मक कादंबरीसाठी आवश्यक असणाऱ्या घटकांपैकी चरित्र हा प्रमुख घटक आहे. चरित्राच्या आधारेच कादंबरीची मांडणी करता येते. कादंबरीसाठी चरित्र मुख्य केंद्र असते व इतर काल्पनिक घटना, प्रसंग, स्वभाव, मनोविश्लेषण हे इतर घटक ह्यांच्या आधारे कादंबरीची मांडणी करता येते. म्हणूनच सदा कऱ्हाडे म्हणतात, "कोणत्याही ललित वाङ्मयापेक्षा कादंबरी हा प्रकार चरित्राला अधिक जवळचा आहे. कादंबरीत ज्या प्रकारे व्यक्ती, कृती, उक्ती, प्रसंग, घटना, स्वभाव, मनोविश्लेषण इत्यादी घटक असतात; तसेच चरित्रातही असतात असे असूनही चरित्र कादंबरी नसते, हा दोघांमधला फरक आहे."[११]

मराठी वाङ्मयात जे वेगवेगळे प्रकार आहेत, त्यातच 'चरित्र' आणि 'कादंबरी' हे दोन आपआपल्या वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्वाने नटलेले असे प्रकार होत. हे दोन्हीही प्रकार मराठी वाचकांना आता चांगले उमजलेले आहेत. चरित्रात्मक कादंबरी निर्माण करण्यामागची लेखकाची भूमिका कोणती व वाचकांची भूमिका कोणती, हे आता थोडक्यात पाहू.

वाचकांची भूमिका ही कादंबरीतील विषयाशी जास्त निगडीत असते. कादंबरीपेक्षा कादंबरीतील विषय त्यांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचा असतो. 'अमृतपुत्र' ह्या कादंबरीत लालबहादूर शास्त्रीनी केलेले कार्य, लोकशाहीचा पुरस्कार, अन्यायाविरूध्द उठवलेला आवाज, युध्दाच्या वेळी (भारत-पाक) देशाचे सांभाळलेले नेतृत्व, त्यांची प्रेरणा, युध्द संपताच पाकिस्तानबरोबर मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी पणास लावलेली सर्व शक्ती ह्या सर्व गोष्टींचा तपशीलवार वृत्तांत आपल्यासमोर येतो. म्हणूनच चरित्रात्मक कादंबरीतील विषयच अधिक महत्त्वाचा असतो.

कोणतीही वाङ्मयीन कृती ही कलात्म जाणिवांना प्राधान्य देणारीच असते. गंगाधर गाडगीळ ह्यांनी 'दुर्दम्य' ही कादंबरी लिहिताना आपण कलात्मक निर्मिती करण्याचा प्रयत्न केलेला आहे, असे मत व्यक्त केले आहे. 'दुर्दम्य' ही कादंबरी बारा वर्षांच्या मुलापासून ते सत्तरी गाठलेल्या वृध्दापर्यंत अनेक स्त्री-पुरुषांनी अगदी तन्मयतेने वाचली, ह्यामागचे कारण म्हणजे टिळक ह्या विषयाला तर अधिक प्राधान्य मिळतेच. पण त्याचबरोबर त्या विषयाची एक वेगळीच मांडणी करून कलात्मक निर्मिती केलेली असते आणि कलात्मक निर्मिती वाचकांच्या आवडीची व आस्थेची असते.

ज्या व्यक्ती आपल्याला पूर्णपणे परिचित असतात, अशा व्यक्तीविषयी आपण लिहितो, वाचतो व ज्या पूर्णपणे परिचित असतात, अशाच व्यक्तींच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबऱ्यांचा प्रपंच थाटलेला असतो. ज्या व्यक्तींविषयी बहुसंख्य वाचक

अजूनही परिचित नसतात, त्यांच्या जीवनावरही चरित्रात्मक कादंबरी यशस्वी ठरू शकते. 'दुर्दम्य' कादंबरी अजरामर ठरलीच. पण त्याचबरोबर 'होरपळ' कादंबरी घेतली, तर ती वि. ग. कानिटकरांची 'नीळकंठ गोऱ्हे' ह्यांच्या जीवनावर लिहिलेली आहे. नवीन व्यक्ती ज्ञात करून घेण्याची औत्सुक्यही वाचकांच्या ठिकाणी असते.

चरित्रात्मक कादंबरी यशस्वी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे चरित्रात्मक कादंबरीतील नायकाविषयी असलेली आत्मीयतेची भावना. चरित्रात्मक कादंबरीत जो नायक असतो, त्याच्या बद्दल लोकांच्या मनात श्रध्देची, आदराची, गौरवाची, आत्मीयतेची भावना असते. त्यासाठी ते विविध माध्यमातून त्याचे चरित्र आजमावण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु चरित्रात्मक कादंबरीतून ते जास्त प्रमाणात वाचकांना उमजलेले असते. म्हणूनच त्या चरित्रनायकाबद्दल लेखकाच्या मनातील आत्मीयतेची भावना वाचकांच्या मनात रुजवली जाते.

चरित्रात्मक कादंबरीत चित्रित झालेल्या व्यक्तीच्या जीवनावर अनेक चरित्रे झालेली असतात. तरीही वाचक ते चरित्र न वाचता चरित्रात्मक कादंबरीच का वाचतात ? शिवाजी महाराजांची चरित्रे आज उपलब्ध आहेत. ती वाचल्यानंतर त्यांच्या जीवनातील विविध घडामोडींचा तपशील कळू शकतो. तरीही रणजित देसायांची 'श्रीमान योगी' वाचकांना आवडीने वाचावीशी वाटतेच. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे ह्यांचे कथन मंत्रमुग्ध करते. ह्याचे कारण म्हणजे सर्वसामान्य वाचक हा साहित्यिक भाषेकडे आकर्षित झालेला असतो. रूक्ष भाषेपेक्षा साहित्यिक, लालित्यपूर्ण भाषेतून त्या आदरणीय व्यक्तीच्या जीवनकथेचा आस्वाद घेणेच वाचकांना जास्त रुचकर वाटते.

चरित्रनायकाच्या घडामोडींचा तपशील सत्य स्वरूपात जाणून घेण्यासाठी केवळ माहितीवजा असलेले चरित्र वाचकांना वाचण्यात स्वारस्य वाटत नाही. ते त्यांना कंटाळवाणे वाटते. परंतु चरित्रात्मक कादंबरीत मृत झालेली व्यक्ती जणू पुन्हा जीवित होऊन वाचकांशी

संवाद साधत असते, गतिमान जीवनाचे रूप साकार करीत असते. कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या गतिमान जीवनाचा प्रत्यय आणून देणाऱ्या असतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा सजीव करून त्यांची एकूण हालचाल कादंबरीत मांडावी लागते. अनेक युक्त्या अवलंबून कादंबरीकार ती व्यक्तिरेखा सजीव, जिवंत असल्याचा आभास निर्माण करीत असतो. चरित्रात्मक नायकाचे प्रत्यक्ष जीवन घडून गेलेले असते. तरीही प्रत्यक्षपणे ते वाचकांसमोर घडत असते. ते त्यांच्यासमोर लहानाचे मोठे होतात. ह्या सर्व घटना-प्रसंगांचे तपशीलवार दर्शन वाचकांसमोर घडत असते. कादंबरीकाराने काही भाग कल्पनेने रचलेला असला, तरी वाचक त्यामागील सत्यता ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहत न बसता कल्पनेने निर्माण केलेले असले, तरी त्याच्याशी तादाम्य पावतात.

जे वाचक वाङ्मयीन अभिरुचीने समृध्द झालेले असतात (समीक्षक), त्यांच्या दृष्टिकोनातून चरित्रात्मक कादंबरी एक कलाकृतीच असते. कलाकृतीकडून ज्या अपेक्षा असतात, त्याच अपेक्षा चरित्रात्मक कादंबरीकडून त्यांच्या असतात. कादंबरीचा विषय - 'महात्मा गांधी' असो किंवा 'नीलकंठशास्त्री गोऱ्हे' असो, ही बाब त्यांच्या दृष्टीने गौण समजली जाते. 'आनंदी-गोपाळ' ह्या कादंबरीचे समीक्षण करताना ल. ग. जोग हे समीक्षक लिहितात, " आणि मला ही कादंबरी महत्त्वाची वाटते ती एक समर्थ शोकांतिका म्हणून इतिहासातील या घटनातून विविध अर्थ जाणवणे आणि अर्थासह तो अनुभव व्यक्त होणे यातच ललित लेखकाचे सामर्थ्य असते. श्री. जं च्या 'आनंदी-गोपाळ' कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेली ही उध्वस्त सहजीवनाची कथा वेगवेगळ्या प्रकारे अर्थपूर्ण होते आणि त्या अर्थपूर्णतेतून ती महान शोकांतिका ठरते."[१२]

## २.५ मराठी चरित्रात्मक कादंबरी : विकास :

मराठी साहित्यात 'कादंबरी' चे अनेक प्रकार पाहावयास मिळतात. 'चरित्रात्मक कादंबरी' हा एक कादंबरीचा प्रकार आहे. आता तो अधिक लोकप्रिय ठरला आहे.

ऐतिहासिक आणि राजकीय कादंबरीला हा जवळचा असा कादंबरीप्रकार आहे. खरे तर आपणासमोर ती व्यक्ती जशीच्या तशी उभी करणे, हे काम फक्त नाटकाचेच होते. परंतु नंतर चरित्रात्मक कादंबरीद्वारे ती व्यक्ती आपणासमोर जशीच्या तशी उभी राहिली. चरित्रात्मक कादंबरीत व्यक्तीला प्राधान्य दिलेले असते. व्यक्ती हीच त्या कादंबरीची केंद्र असते. त्या व्यक्तीभोवतीच कादंबरी फिरत असते. तीच व्यक्ती कादंबरीत उठावदारपणे येते. चरित्रात्मक कादंबरीत व्यक्ती मानवतावादाच्या आदर्श रूपात व्यक्त झालेली असते. आजच्या वर्तमान जीवनाशी तिचे कुठेतरी संबंध जुळलेले असतात. आजच्या ह्या भ्रष्टाचारी, संघर्षमय, मूल्यविरहित समाजामध्ये म्हणूनच ती लक्षणीय असते. ऐतिहासिक कादंबरीचा विकास होऊनच 'चरित्रात्मक कादंबरी' चा जन्म झालेला आहे. 'चरित्रात्मक कादंबरी' तून त्या व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्वच जीवनाचा, तिच्या कार्याचा, तिच्या विचारप्रभावाचा संपूर्ण पट आपल्यासमोर कादंबरीकाराने उलगडलेला असतो. तसेच ते एखाद्या व्यक्तीचे निव्वळ चरित्र नसते किंवा चरित्रनायकाचा निव्वळ जीवनपटच उलगडून दाखविलेला नसतो. व्यक्तीच्या चरित्रातून तिचे आपणासमोर प्रकट झालेले एक वास्तव रूप, तिची प्रतिमा आपल्या मनावर बिंबत असते. ह्या प्रतिमेचे दर्शन कादंबरीकार आपणास घडवीत असतो. तिचे ध्येयवादी, उदात्त, करारी, बंडखोर, व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर येते. चरित्रात्मक कादंबरी लिहिताना सत्य घटना, कलात्मक कल्पकता, चिंतनशीलता इत्यादी गोष्टींची आवश्यकता असते.

मराठी चरित्रात्मक कादंबरीचा उदय व तिचा विकास फारच झपाट्याने झाला. खरेतर 'नाटक' ह्या वाङ्मयप्रकारातूनच आपल्यासमोर व्यक्ती उभ्या केल्या जात. परंतु चरित्रात्मक कादंबरीकारच आता त्या व्यक्तिप्रधानतेने झपाटून गेलेले आपल्याला दिसून येतात. चरित्रनायकाचा काळ जिवंत करीत करीत कादंबरी लिहिली जाते. काळ व व्यक्ती ह्यांचे नाते जोडण्याचा तो प्रयत्न असतो. 'चरित्रात्मक कादंबरी' हा वाङ्मयप्रकार

'कादंबरी' आणि 'चरित्र' ह्या मूळ वाङ्मयप्रकारांमधून जन्मला असल्यामुळे 'चरित्रात्मक कादंबरी' हे नाव त्याला उचित ठरते. चरित्रात्मक कादंबरी लिहिणे म्हणजे तारेवरची कसरत असते. ती ऐतिहासिकही असते व व्यक्तीचे चरित्रही असते. परंतु ऐतिहासिक कादंबरीप्रमाणे येथे अद्‌भुतरम्यता, कल्पनारम्यता ह्यांना वाव नसतो. रंजकता तर नसतेच नसते. जे सत्य आणि वास्तव आहे, त्याचेच चित्रण कादंबरीत होत असते. चरित्रात्मक कादंबरी लिहीत असताना संशोधक आणि सर्जक ह्या दोन्ही बाजू सांभाळून दोन्हीचा मेळ घालून पावलोपावली दक्षता घ्यावी लागते. तसेच ऐतिहासिक सत्याच्या हातात हात घालून हा प्रवास करावा लागतो. मराठी वाङ्मयात पौराणिक पुरुष, ऐतिहासिक राष्ट्रपुरुष, समाजसवेक, लेखक अशा अनेक थोर व्यक्तींच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबऱ्या प्रसिध्द झालेल्या आहेत. राष्ट्रपुरुषावरील पहिली चरित्रात्मक कादंबरी लिहिण्याचा मान भा. द. खेर ह्यांना मिळतो. त्यांनी चरित्रात्मक कादंबरीबाबत नोंदवलेली प्रतिक्रिया बोलकी आहे. ते लिहितात, "१९६१ साली काहीशी मरगळलेली अवस्था निर्माण झाली. साहित्याला तोच-तोचपणा आलेला होता. केवळ जुन्यावरच नवे बुरखे चढविले जात होते. अशावेळी ऑयर्पिन स्टोन ह्यांची 'लस्ट फॉर लाईफ' ही चरित्रात्मक कादंबरी वाचनात आली व मराठीतील पहिली चरित्रात्मक लिहिण्याचा संकल्प मी सोडला."[५] ह्या मतावरून व कालानुक्रमाने अभ्यास केला, तर खेरांची 'यज्ञ' (१९६८) हीच राष्ट्रपुरुषावरील मराठीतील पहिली चरित्रात्मक कादंबरी म्हणता येईल. तत्पूर्वीची 'स्वामी' (१९६२) ही रणजित देसाई ह्यांची ऐतिहासिक स्वरूपातील पहिली चरित्रात्मक कादंबरी होय, तर 'आनंदी-गोपाळ' ही श्री. ज. जोशी ह्यांची सामाजिक स्वरूपातील पहिली चरित्रात्मक कादंबरी होय.

चरित्रात्मक कादंबरीचे पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक असे विविध प्रकार पडतात. ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरीमध्ये इतिहासाला जास्तीत जास्त प्रामाणिक राहून एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीचे थोरपण दाखविले जाते, त्या व्यक्तीचा गौरव केलेला असतो.

इतिहासातील व्यक्तिरेखा जशाच्या तशा इतिहासाला धरून रंगविण्याचा एक यशस्वी प्रयोग रणजित देसाई ह्यांच्या 'स्वामी' (१९६२) ह्या कादंबरीने केला. पानिपतचे युध्द झाल्यानंतर राजकीय घडी विस्कटल्याच्या पार्श्वभूमीवर माधवरावांनी सावरलेल्या राज्यकारभाराचे चित्रण ह्यात आलेले आहे. 'श्रीमान योगी' (१९६८) ह्या रणजित देसाई ह्यांच्या कादंबरीत छत्रपती शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराचे चित्रण आलेले आहे. ना. सं. इनामदारांच्या 'झुंज' (१९६६), 'झेप' (१९६३), 'मंत्रावेगळा' (१९६९) ह्या कादंबऱ्यांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले होते.

पौराणिक चरित्रात्मक कादंबरीत 'ययाती' ही वि. स. खांडेकर ह्यांची १९५९ मध्ये लिहिलेली कादंबरी मोडते. 'ययाती' च्या रूपाने ययातीची कामकथा आपल्यासमोर आलेली आहे. 'ययाती' मुळे मराठीत पौराणिक कादंबरीची एक नवी परंपरा अस्तित्वात आली. शिवाजी सावंत ह्यांनी थोडक्या अवधीतच 'मृत्युंजय' (१९६७) ही प्रभावशाली कादंबरी लिहिली. पात्रमुखी अशीच ही कादंबरी आहे. कर्णाची ही भावकथा आहे. कर्णाच्या जीवनाचा वेध सावंतांनी घेतला आहे. 'राधेय' (१९८६) ह्या रणजित देसाई ह्यांच्या कादंबरीत कर्णाचे म्हणजेच राधा व अधिरथ ह्या जोडप्याने सांभाळ केलेल्या राधेयाचे जीवनचित्रण आलेले आहे. सामाजिक चरित्रात्मक कादंबरीत 'आनंदी-गोपाळ' (१९६८) चा उल्लेख आवर्जून करावा लागतो. श्री. ज. जोशी ह्यांनी लिहिलेल्या ह्या कादंबरीत आनंदीबाईंच्या व गोपाळरावांच्या जीवनाची कहाणी आलेली आहे. गोपाळरावांच्या हट्टी स्वभावामुळे आनंदीबाईंनी सहन केलेले कष्टप्रद जीवन व शेवटी डॉक्टर होऊनही त्याचा त्यांना काहीही उपयोग झाला नाही. शेवटी त्यांचा इलाज करण्यासही कोणताही डॉक्टर तयार होत नव्हता इतपत परिस्थिती झाली होती. त्याचे सविस्तर चित्रण 'आनंदी-गोपाळ' मध्ये आलेले आहे.

'महात्मा'(१९९९) ही चरित्रात्मक कादंबरी राष्ट्रपुरुष असलेल्या म. जोतिबा फुले ह्यांच्या चरित्रावर आधारित रवींद्र ठाकूर ह्यांनी लिहिलेली आहे. त्यापूर्वी लिहिल्या गेलेल्या राष्ट्रपुरुषांवरील चरित्रात्मक कादंबऱ्यांचा थोडक्यात आढावा आपल्याला आता घ्यायवचा आहे.

१. 'यज्ञ' (१९६८) : भा. द. खेर व शैलजा राजे

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार 'यज्ञ' मध्ये होतो. आपल्या स्वतःच्या छोट्या संसारापेक्षा देशाचा संसार करण्यातच आपले सुख त्यांनी शोधले होते. त्याचेच चित्रण खेर व शैलजा राजे ह्यांनी केलेले आहे. 'शत्रूला मारता मारता मरेन', अशी शपथ सावरकरांनी घेतली होती व मातृभूमी जोपर्यंत पारतंत्र्यातून मुक्त होत नाही, तोपर्यंत आत्मतृप्तीही होणार नाही, असे म्हटले होते. अखंड हिंदुस्थानचे स्वप्न त्यांनी उरी बाळगले होते.

२. 'पुत्र मानवाचा' (१९६९) : मृणालिनी देसाई

म. गांधी ह्यांच्या जीवनचरित्रावर रचलेली ही कादंबरी आहे. म. गांधी जर वकील झाले असते, तर त्यांना कुठल्याही गोष्टीची उणीव भासली नसती. पण त्यांना फक्त एकाच व्यक्तीची केस घ्यायची नव्हती, तर भारतातील सर्वच गरीब जनतेचे त्यांना वकील व्हावयचे होते, त्यांच्या न्यायासाठी त्यांना झगडावयाचे होते. गांधाजीही आपल्यासारखेच माणूस होते. त्यांचीही स्वतःची काही सुखःदुःखे होती, ह्याची प्रकट जाणीव मृणालिनी देसाई ह्यांनी ह्या कादंबरीत करून दिली आहे.

३. 'दुर्दम्य' (१९७०) : गंगाधर गाडगीळ

लो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे विकसन ह्या कादंबरीत रेखाटलेले आहे. संमिश्र, बहुरंगी व्यक्तित्व, विचार कार्यपध्दती इ. सर्व घटकांचे सम्यक् दर्शन गंगाधर गाडगीळ ह्यांनी 'दुर्दम्य' मध्ये केलेले आहे. बाळ गंगाधर टिळक व्यक्ती म्हणून कोण होते, त्यांची धडपड

कशासाठी होती, ह्याचे जिवंत चित्रण ह्या कादंबरीतून दिसून येते. त्यांना एकट्याच्या मोक्षापेक्षा पारतंत्र्यात असलेल्या देशबांधवांना स्वातंत्र्य मिळवून द्यावयाचे होते.

४. 'प्रेषित' (१९७०) : न. म. जोशी

म. गांधी ह्यांच्याच जीवनचरित्रावर लिहिलेली ही कादंबरी आहे. स्वावलंबन, सत्य, अहिंसा, असहकार, नि:शस्त्र प्रतिकार, सत्याग्रह, उपोषण ह्या नवीन नवीन शस्त्रांद्वारे म. गांधींनी भारतीय जनतेमधील आत्मविश्वास जागृत केला होता. म. गांधी ह्यांच्या सहवासातील व्यक्तींवर गांधीजींची किती जबरदस्त छाप होती, ह्याचाही परिचय न. म. जोशी ह्यांनी ह्या कादंबरीत करून दिला आहे.

५. 'अमृतपुत्र' (१९७०) : भा. द. खेर

लालबहादूर शास्त्री ह्यांच्या जीवनचरित्राची कहाणी ह्या कादंबरीत आहे. 'जय जवान, जय किसान' च्या घोषणेने सारा भारत हादरून टाकणारे, भारताला नेतृत्व देणारे, ज्यांचे गांधीजी व नेहरू हे आदर्श होते, अशा लालबहादूर शास्त्री ह्याच्या निरनिराळ्या कार्यातून आदर्श असे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर भा. द. खेर ह्यांनी उभे केलेले आहे. शास्त्रीजी लोकशाहीचे ज्वलंत पुरस्कर्ते होते. साधेसुधे, तत्त्वनिष्ठ, आदर्श जीवन चित्रित करून चरित्रकाराने शास्त्रीजींचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे.

६. 'उत्तरयोगी' (१९७३) : ज्योत्स्ना देवधर

ज्योत्स्ना देवधर ह्यांनी योगी अरविंद घोष ह्यांच्या क्रांतिकारी लढ्याचे, देशासाठी त्यांनी केलेल्या त्यागाचे, तुरुंगवासाचे, देशभक्तीचे, विचारांचे, त्यांच्यातील बदलांचे, आध्यात्मिक आणि राजकीय प्रेरणांमधील ओढाताणीचे व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी केलेल्या आध्यात्मिक योगबळाच्या वापराचे चित्रण केले आहे.

७. 'आनंदभवन' (१९७४) : भा. द. खेर

भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या व स्वातंत्र्योत्तर काळाचा इतिहास घडविणाऱ्या नेहरू कुटुंबातील मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू व इंदिराजी ह्यांचे राजकीय जीवन, प्रत्येकाचे वेगवेगळे व्यक्तिमत्त्व, तसेच गांधींच्या सहवासात आल्यावर त्यांच्यात झालेली वैचारिक क्रांती ह्यांचा कलात्मक आविष्कार आपल्याला ह्या कादंबरीत पहावयास मिळते.

८. 'ओम राष्ट्राय स्वाहा' (१९८७) : मृणालिनी जोशी

रा. स्व. संघाचे गोळवलकर गुरुजी ह्यांचे राष्ट्रासाठी सारे जीवन अर्पण करणारे व्यक्तिमत्त्व त्यांच्या देशभक्तीसह सौ. मृणालिनी जोशी ह्यांनी ह्या कादंबरीत चित्रित केलेले आहे.

९. 'प्रबुध्द' (१९८९) : भा. द. खेर

ह्या कादंबरीत दलितांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी केलेल्या कार्याचे चित्रण भा. द. खेर ह्यांनी केलेले आहे. ज्यांना पिढ्यानपिढ्या गाववेशीबाहेर शेकडो वर्षे रूढींच्या विळख्यात अडकून राहावे लागले, अशा लोकांना सामाजिक लोकशाही मिळवून देणाऱ्याा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या झुंजार व्यक्तिजीवनाचे, ज्ञानार्जनाच्या तळमळीचे, त्यांच्या प्रयत्नाचे हे चरित्र आहे.

१०. 'वादळातील दीपस्तंभ' (१९८९) : गो. नी.दांडेकर

डॉ. हेगडेवार हे स्वत: डॉक्टर असूनही डॉक्टरकी न करता समाजासाठी सतत कष्ट उपसत राहिले, ह्याचे चित्रण गो. नी. दांडेकरांनी ह्या कादंबरीत केलेले आहे.

११. 'सत्यं, शिवं, सुंदरम्' (१९९१) : रवींद्र भट

स्वामी विवेकानंदाच्या जीवनातील प्रसंगांवर ही कादंबरी रवींद्र भट ह्यांनी लिहिली आहे. सर्व भारत फिरून झाल्यावर विवेकानंदांना मानवामधील दानवाचे दर्शन घडले. तेव्हा आधी माणूस घडावयला हवा, स्वातंत्र्याचा नेमका अर्थ सर्वांना कळला पाहिजे, असे त्यांना

वाटले. सत्यं, शिवं, सुंदरम् ह्या मंत्राची जपणूक करून विवेकानंदानी जीवनगाथा समजावून सांगितली.

१२. 'अर्घ्यदान' (१९९१) : विद्या सप्रे-चौधरी

इंदिरा गांधी ह्यांची हत्या झाली. पण त्या आजही अमर आहेत. सत्ताधीश असूनही 'माणूस' म्हणून त्या कशा होत्या, एक स्त्री होत्या, तरीही पुरुषापेक्षाही सबंध भारताच्या जनतेचे ओझे त्यांनी कसे सोसले, त्यांच्यातील नाती कशी होती ह्या सर्व गोष्टींचे चित्रण विद्या सप्रे-चौधरी ह्यांनी कादंबरीत केलेले आहे.

१३. 'महात्मा' (१९९९) : रवींद्र ठाकूर

'महात्मा' ही म. जोतिबा फुले ह्याच्या चरित्रावर रचलेली अशी कादंबरी असून फुले ह्यांनी केलेल्या समाजजागृतीच्या कामगिरीचे चित्रण, तसेच त्यांना त्या त्या वेळेस झालेला त्रास, त्यांच्यावर आलेले बिकट प्रसंग, कोणत्याही संकटाला न डगमगता अविरत कष्ट करत राहण्याची त्यांची वृत्ती ह्या सर्वांचे चित्रण रवींद्र ठाकूर ह्यांनी 'महात्मा' ह्या कादंबरीत केलेले आहे.

## २.६ समारोप :

थोडक्यात, चरित्रात्मक कादंबरीची निर्मिती कादंबरीकाराच्या दृष्टीने मोठे आव्हानच असते. ती एक वैशिष्ट्यपूर्ण घटना असते. ती लौकिक जीवनाचा आधार असलेली अशी असते. भूतकाळात होऊन गेलेल्या चरित्रनायकाच्या जीवनाचा आलेख समाजात अजूनही अस्तित्वात असतो. त्याचे विविधरंगी व्यक्तिमत्त्व व त्याच्याविषयीच्या समाजाच्या प्रतिक्रिया ह्यांना कादंबरीत साकार केलेले असते. ते साकार करणे सोपे नसते. कादंबरीकार काल्पनिक अनुभवांच्या मांडणीतून नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण उभे करतो. चरित्रात्मक कादंबरीकाराला वास्तवात होऊन गेलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या अनुभवांची पुनर्मांडणी करावी लागते. ह्या प्रक्रियेला स्थलकालाच्या मर्यादा येतात. आपल्या मनात

निर्माण झालेल्या प्रतिभेला वाङ्मयकृतीच्या तंत्राच्या चौकटीत पकडण्याच्या कौशल्याची कसोटीच असते.

चरित्रात्मक कादंबरी हा वाङ्मयप्रकार आज अधिक लोकप्रिय झालेला दिसून येतो. तो लोकप्रिय होण्याची कारणे आजच्या नागरी जीवनात दिसतात. आजचा समाज शिक्षित झालेला आहे, आपल्या स्वत:विषयी जागृत झालेला आहे. तळागाळातल्या लोकांपासून स्त्री, पुरुष, दलित, शेतकरी, राज्यकर्ते अशा सर्वांनीच आपआपली चरित्रे-आत्मचरित्रे लिहिली. पुढे त्यातूनच चरित्रात्मक कादंबरी निर्माण झाली व अधिक लोकप्रिय ठरली.

अशा प्रकारे आपण प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रथम चरित्रात्मक कादंबरी म्हणजे काय, हे स्पष्ट करून तिची स्वरूप संकल्पना मांडली आहे. नंतर मराठीतील चरित्रात्मक कादंबरीचा विकास स्पष्ट केला आहे. आता पुढील प्रकरणामध्ये चरित्रात्मक कादंबरी असलेल्या 'महात्मा' ह्या रवींद्र ठाकूर लिखित कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करताना प्रथम तिच्यातील कथानकाचा विचार करावयाचा आहे.

# संदर्भ

१. हस्तक उषा, 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार' (वा. ल. कुळकर्णी गौरव ग्रंथ), मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती - १९८७, पृ. २५५

२. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरी इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ.५-६

३. नेमाडे भालचंद्र, कादंबरी (लेख) समाविष्ट : पवार गो. मा. व हातकणंगलेकर म. द. (संपा.) 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप (१९५०-१९७५), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८६, पृ. २४

४. जाधव रा. ग. , 'मराठी विश्वकोश' (संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी), खंड ३, म. रा. सा. स. मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. ६००

५. खेर भा. द., 'यज्ञ', मधुकुंज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६८, पृ. ५४

६. कऱ्हाडे सदा, 'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मय, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६, पृ. २७

७. रावते ग. का. , 'मराठी चरित्रे : मूलतत्त्वे व समीक्षा', समर्थ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८५, पृ. ८२

८. तत्रैव, पृ. १५

९. गोरे दादा, 'गोनीदांची ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरी', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. ४२

१०. रावते ग. का., उनि, पृ. ८२

११. कऱ्हाडे सदा, उनि, पृ. ६३

१२. जोग ल. ग., नवी मराठी कादंबरी (लेख) समाविष्ट 'आलोचना', मुंबई, ऑगष्ट, १९७१, पृ. २२